राज्यसेवा मुख्य परीक्षा -२०१९ अन्वये शिफारसप्राप्त ठरलेल्या व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-७ अंतर्गत प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ या संवर्गातील अधिकाऱ्यांना नियमित पदस्थापना देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन आदेश क्र. संकीर्ण २०२४/ प्र.क.५०/२४/उद्योग-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १४ मार्च, २०२४

वाचा :

१. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दि.२०.०१.२०१४
२. सामान्य प्रशासन विभाग, कार्यालयीन आदेश क्र. टिआरएन-१०२१/प्र.क्र.२९/सीपीटीपी-अ, दि.१३.०१.२०२२, दि.२४.१२.२०२१
३. सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या-१२, दि.१४.०७.२०२१
४. सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र. टिआरएन-२०२४/प्र.क्र.१४/प्रशि-२, दि.०५.०३.२०२४

शासन आदेश :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षा-२०१९ अन्वये उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ (वेतनस्तर एस-२०: ५६१००-१७७५००) या संवर्गात शिफारशीसाठी पात्र ठरलेल्या व सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण धोरणांतर्गत (सीपीटीपी-७) अंतर्गत प्रशिक्षण पुर्ण करुन संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये या विभागाकडे विभागीय संवर्ग वाटप करण्यासाठी पाठविण्यात आलेल्या अधिका-यांना खालील परि. २ मध्ये नमूद अटींच्या अधीन राहून त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ३ येथे नमूद ठिकाणी नियमित पदस्थापना देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	पदस्थापनेचे ठिकाण	शेरा
१	२	३	४
१	श्री. योगेश राजीव सारणीकर	जिल्हा उद्योग केंद्र, जालना	रिक्त पदी
२	श्री. प्रमोद संभाजी लांडे	जिल्हा उद्योग केंद्र, बुलडाणा	रिक्त पदी
३	श्री. सुनिल बाबासो हजारे	जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा	रिक्त पदी
४	श्री. निलेश बलभीम गायकवाड	विभागीय कार्यालय, नागपूर	रिक्त पदी
५	श्री. संजय गणेश भुरेवाल	उद्योग संचालनालय, मुख्यालय, मुंबई	रिक्त पदी
६	श्रीमती मंगला लक्ष्मणराव शिरसाठ	मुंबई प्रादेशिक विभाग, मुंबई	रिक्त पदी

२. उपरोक्त तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांची नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहील.

अ) सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील कार्यालयीन आदेशातील अटींच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

ब) उपरोक्त अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आणण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागामार्फत स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात येणार आहेत. त्यामुळे संदर्भ क्र. ४ अन्वये निश्चित केलेली ज्येष्ठता यादी ही अधिकाऱ्यांनी परिविक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पुर्ण करण्याच्या अधीन आहे.

३. उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांनी विहीत मुदतीत त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे व त्यांचा रुजू अहवाल विकास आयुक्त (उद्योग) यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३१४१९०७०५५०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHASHANK TUKARAM CHAVAN

Digitally signed by SHASHANK TUKARAM CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=7dd1791f8c7f2d8cbabbae6c3c11ac3d4fe93ccab49daf36ff24dacd585e2276, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A089DF063F1FFA9C6E2D052DB3C26C5B1ECE40048A4A7D39615BEE66D9E2053D, cn=SHASHANK TUKARAM CHAVAN
Date: 2024.03.14 19:16:22 +05'30'

(शशांक चव्हाण)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३) विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई ४०० ०३२.
४) महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),१/२,महाराष्ट्र ,मुंबई/नागपूर.
५) उद्योग सहसंचालक,मुंबई प्रादेशिक विभाग.
६) उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालये.
७) संबंधित महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
८) अधिदान व लेखाधिकारी अधिकारी, मुंबई.
९) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१०) संबंधित सर्व परिविक्षाधीन उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ (उद्योग संचालनालयामार्फत)
११) निवडनस्ती (उद्योग-३)